Nutan Shikshan Prasark Mandal, Desaiganj's

# ADARSH ARTS AND COMMERCE COLLEGE, DESAIGANJ (WADSA)

Dist- Gadchiroli (Maharshtra) 441207

Affiliated to Gondwana university, Gadchiroli

Re-accredited by NAAC 'B' with 2.15 CGPA

---

# SELF STUDY REPORT

# 2017-18 to 2021-22

---

## CRITERION – V

## Student Support and Progression

**METRIC NO.** :- 5.4 Alumni Engagement

**METRIC NAME** :- 5.4.1 There is registered Alumni Association That contributes significantly to the development of the institution through financial and/or other support services

सत्यमेव जयते

# नोंदणीचे प्रमाणपत्र

(संस्था नोंदणी अधिनियम,१८६०)
(१८६० चा अधिनिअयम २१)

नोंदणी क्रमांक : **गडचिरोली/0000047/2021**

यादवारे असे प्रमाणित करण्यात येते की, **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन**

खालील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली.

तारीख 16 July 2021 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

# Certificate of Registration

(The Societies Registration Act, 1860)
(Act XXI of 1860)

Registration Number: **Gadchiroli/0000047/2021**

It is certified that, **Adarsh Mahavidyalaya Maji Vidyarthi Association** has this day been duly registered under the Societies Registration Act,1860(XXI of 1860)

Given under my hand this 16 Day of July 2021.

16/7/2021

Assistant Registrar of Society,
सहायक संस्था निबंधक
गडचिरोली

ASSISTANT REGISTRAR OF SOCIETIES GADCHIROLI
सहायक संस्था निबंधक गडचिरोली

Gadchiroli

# सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या नोंदणीसाठीचा अर्ज

अनुसूची २

(नियम ६)

प्रति,

मा. सहाय्यक संस्था निबंधक /उप धर्मादाय आयुक्त ,

गडचिरोली

यांस, आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधी मी श्री. अशरफ अब्दूल रऊफ खानानी, पद, सहसचिव याद्वारे उपनिर्देशित सार्वजनिक विश्वस्त /व्यवस्थेचा विश्वस्त सार्वजनिक न्यास नोंदणीसाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०चे कलम १८ अन्वये सदरहू अर्जसादर करीत आहे.

२. मी, नोंदणी कामी पुढीलु आवश्यक तपशील सादर करीत आहे.—

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था पुढीलु नावाने ओळखली जाईल असे नांव व पुर्ण पत्ता :

संसथेचे पुर्ण नावः **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा)**

संस्थेचा पत्ताः **द्वारा आदर्श कला व वाणिज्य महाविद्याल, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली**

१. विश्वस्त / व्यवस्थापक /पदाधिकारी यांची नांवे:

| अ. क्र | संपूर्ण नाव | पत्ता | हुद्दे | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. भरत संतोषकुमार शामदासानी | रा. कन्नमवार वार्ड, सिंधी कॉलोनी, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | अध्यक्ष | ४२ | व्यापार | भारतीय |
| २. | कु. माधुरी माणिक नाकाडे | द्वारा. श्रीराम गहाणे, प्रागतिक गर्ल्स हायस्कुल, गांधी वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | उपाध्यक्ष | ४१ | नोकरी | भारतीय |
| ३. | श्री. मो. एजाज. मो. युनुस खानानी | रा. किदवाई वार्ड, मदिना मजीद जवळ, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | सचिव | ४१ | व्यापार | भारतीय |
| ४. | श्री. अशरफ अब्दूल रऊफ खानानी | रा. किदवाई वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | सह सचिव | ३८ | व्यापार | भारतीय |
| ५. | श्री. मो. शौकत हुसैन मो. युनूस पंजवानी | रा. जवाहर वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | खजिनदार | ४० | व्यापार | भारतीय |
| ६. | श्री. राजेंद्र मोतीराम बुल्ले | रा. सावंगी, ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | सह खजिनदार | ४४ | खाजगी नोकरी | भारतीय |
| ७. | श्री. नितीन मनोहर लांडगे | रा. जुनी वडसा रोज, वडसा वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | कार्यकारी सदस्य | ४० | धान्य अडत्या | भारतीय |
| ८. | श्री. नितीन दादाजी राऊत | मु. पो. कोंढाळा, ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | कार्यकारी सदस्य | ४१ | कंत्राटदार | भारतीय |
| ९. | श्रीमती. अलका शैलेश सोयाम | द्वारा. रामराव सोयाम, बाबुल चुना कारखाना जवळ कन्नमवार वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | कार्यकारी सदस्य | ४१ | नोकरी | भारतीय |

२. विश्वस्त किंवा व्यवस्थापक यांचे जागी दुसरा विश्वस्त घेण्याची रीत:

दर पाच वर्षानी वार्षीक सार्वसाधारण सभेत गुप्त मतदान पध्दतीने निवडणकी द्वारे लोकशाही पध्दतीने निवडले जातील. तसेच उर्वरित कालावधीसाठी रिक्त झालेल्या पदावर / जागेवर उर्वरित विश्वस्त बहुमताने निवड करतील. अधीक तपशील नियमावलीत पहावा. मात्र सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यकारी मंडळातील पद /पदे रिक्त राहील्यास ते पद भरण्याचा अधिकार मा. सहाय्यक / उप धर्मादाय आयुक्त यांना राहील.

**३. विश्वस्त व्यवस्थेचा हेतु:**

ज्ञापनामध्ये प्रमाणे—

१. माजी विद्यार्थ्यांना चांगले नागरिक होण्यासाठी शिक्षित करणे व या साठी संमेलन आयोजित करणे.

२. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास व कल्याणाशी संबंधित शैक्षणिक संस्थाना मदत करणे.

३. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करण्यासाठी शिष्यवृत्ती, बक्षिसे व इतर सहकार्य देणे.

४. उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा सन्मान करणे.

५. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, व्यक्तीमत्व विकास, अभ्यासक्रम व शिष्यवृत्ती बाबत मार्गशदर्शन उपलब्ध करून देणे.

६. रक्तदान, आरोग्य शिबीर, प्रौढ शिक्षण, महीला सक्षमीकरण प्रकल्प, विद्यार्थ्यांसाठी रोजगार व स्वयंरोजगार विकास, युवकांमध्ये कौशल्य विकास, कमवा आणि शिका योजना सेवाभावी कार्यक्रम राबविणे.

७. विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यासठी कार्यक्रम राबविणे.

८. शिक्षणाचा, संस्कृतीचा आणि नैतिक मुल्यांचा प्रसार करण्यासाठी परिषदा, संमेलन, कार्यशळा, व्याख्याने आणि कार्यक्रम आयोजित करणे.

४. अ) सार्वजनिक विश्वस्त /व्यवस्था निर्माण

करणाऱ्या दस्तएवजाचा तपशील : **परिशिष्ट 'ब' (ज्ञापन) व ठरावाची प्रत**

ब) सार्वजनिक व्यवस्था उगम किवा निर्मीती

संबंधीच्या दस्तऐवजाशिवाय इतर तपशील : **परिशिष्ट 'क' (नियम व नियमावली) ,**

५. सार्वजनिक व्यवस्थेसंबंधी योजना कोणतेही

असल्यास तीचा तपशील: (असल्यास नक्कला जोडाव्यात): नाही

६. जंगम मालमत्तेचे विवरण (असल्यास)

अंदाजे किंमतीसह : रोख रक्कम रू. ४५००/—

संस्थेचे श्री. अशरफ अब्दुल रऊफ खानानी, सहसचिव यांचे कडे जमा आहेत.

७. अ) जेथे स्थावर मालमत्ता असेल ते गांव किंवा नगर भूमापन : नाही

महानगर पालीका किंवा भुमापन क्रमांक क्षेत्र आकार किवा

ब) प्रत्येक स्थावर मालमत्तेची अंदाजे किंमत : नाही

८. सार्वजनिक विश्वस्त /व्यवस्थेच्या उत्पन्नाची साधन :

सभासद फी, वर्गणी, अनुदान, बँकेचे व्याज, प्रवेश शुल्क, देणगी, बक्षिस, दान, संस्थेच्या मालमत्ता पासुन येणारे उत्पन्न हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत असतील. संस्थेच्या उद्देशपूर्ती साठी व त्यासाठीच्या प्रशासनिक कामकाजासाठी त्याचा विनयोग करण्यांत येईल.

९. सरासरी ठोक वार्षीक उत्पन्न : संस्था नविन असल्याने देता येत नाही

१०. सरासरी वार्षीक खर्च : संस्था नविन असल्याने देता येत नाही

११. सरासरी वार्षीक खर्चाची रक्कम :

अ) विश्वस्त व व्यवस्थापक यांचे मानधनावर / पगारावर होणारा खर्च : नाही

ब) आस्थापना व नोकरवर्ग वर होणरा खर्च : संस्था नविन असल्याने देता येत नाही

क) धार्मिक हेतू प्रित्यर्थ होणारा खर्च : ——,,——

ड) धर्मादाय हेत प्रित्यर्थ होणारा खर्च : ——,,——

इ) किरकोळ बाबींवर होणारा खर्च : ——,,——

१२. विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेवरील असलेल्या भारांचा कोणतेही असल्यास त्याचा तपशील : संस्था नविन असल्याने देता येत नाही

१३. विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्ता संबंधातील मालकी हक्काच्या दस्तऐवजांचा तपशील व ते ताब्यात असणाऱ्या विश्वस्तांची नांवे : संस्था नविन असल्याने देता येत नाही

१४. शेरे कोणतेही असल्यांस : संस्थेचे हिशोबाचे वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

१५. तरी फी दाखल रक्कम रूपये ३/— (अक्षरी रू. तीन फक्त) सोबत पाठिवत आहे.

तरी, या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधी विश्वस्तांशी किंवा व्यवस्थापकांशी करावयाचा पत्रव्यवहार पुढील पत्यावर करावा. —

संस्थेचे पुर्ण नांव: **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली**

संस्थेचा पत्ता: **द्वारा आदर्श कला व वाणिज्य महाविद्याल, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली**

व संपर्कासाठी दुरध्वनी कमांक :

दिनांक: २४.१०.२०२०

श्री. अशरफ अब्दूल रऊफ खानानी
(सहसचिव)
आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन,
देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

# पडताळा

मी, अशरफ अब्दूल रऊफ खानानी राहणार किदवाई वार्ड, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली, प्रतिज्ञा करतो व सांगतो की, वरील अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या पुर्ण माहिती प्रमाणे व विश्वासा प्रमाणे खरी आहे. उपनिर्दीष्ट गडचिरोली येथे गांभिर्यपुर्वक प्रतिज्ञा केली.

आज सोमवाररोजी तारीख : 27 ऑगस्ट 2020

AKhanani

श्री. अशरफ अब्दूल रऊफ खानानी
(सहसचिव)
आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन,
देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

माझे समक्ष

Executed & Signed Before Me
ADV.P.N.BUDHE
NOTARY (Govt. Of India)
Regd.No. 15904, DESAIGANJ
DIST GADCHIROLI

(नोटरी / सनदी ~~लेखापाल~~ / वकील / विशेष कार्यकारी दंडाधिकारी)

दस रुपये TEN RUPEES

दिनांक .

## परिशिष्ट 'अ'

प्रति,

सहायक संस्था निबंधक/ धर्मदाय आयुक्त

गडचिरोली जि. गडचिरोली

विषय : संस्था नोंदणी अधिनयम १८६० अन्वये नोंदणी बाबत

संस्थेचे/ मंडळाचे नांव व पत्ता : **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसीएशन, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली**

महोदय,

निवेदन करण्यांत येते की, विषयांत नमद केलेल्या संस्थेची नोदणी संस्था नोंदणी अधिनयम १८६० च्या प्रमाणे करावयाची आहे. सबब आपणांकडे खालील प्रमाणे कागदपत्र सादर करण्यात येत आहे.

१. विधानपत्र (ज्ञापन) (मेमोरेण्ड्म ऑफ असोसिएशन)

२. नियम व नियमावलीची सत्य प्रत. (आर्टीकल ऑफ असोसिएशन)

३. संस्था नोदणी संदर्भात कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांचे संमतीपत्र.

४. संस्था नोदणी बाबत कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांच्या सहीनिशी अधिकारपत्र.

५. संस्था पत्याबाबत व मालमत्ते बाबत अध्यक्ष वा सचिव यांचे प्रतिज्ञापत्र रुपये १००रू च्या स्टॅप–पेपरवर रुपये ५/.च्या कोर्ट फी स्टॅम्पसह.

६. अनुसुची एक (नियम ७)

७. अनुसूची दोन (नियम ८)

७. अनुसूची सहा (नियम १५)

८. संमतीपत्र (१९५०)

९. संस्थेच्या स्थापनेबाबतच्या ठरावाची सत्यप्रत

१०. हमी पत्र

११. प्रथम कार्यकारीणीची यादी

१२. संस्थेच्या पत्या बाबत जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र

१३. जाहिरात फि माफीचा अर्ज

१४. सर्व सभासदाचे ओळखपत्र व पत्त्याचा पुरावा.

पूढे असेही निवेदन करण्यात येते की, वरील संस्थेचे उद्देश सन १८६० च्या संस्था नोदणी अधिनयमाच्या कलम २० अन्वये असुन वरील संस्थाच्या नांवाची वा नामसदृश असलेली संस्था माझे माहिती प्रमाणे अस्तित्वात नाही. नोदणी शनक रुपये ५०रू– (रुपये पन्नास मात्र) भरण्यांस तयार आहे. तरी वरील संस्था नोदणी नोदणी अधिनयम १८६० अन्वये त्वरीत नोंदवावी अशी विनंती आहे.

आपले विश्वासू

**श्री. अशरफ अब्दूल रऊफ खानानी**

**(सह सचिव)**

आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसीएशन,

देसाईगंज (वडसा)

## परिशिष्ट 'ब'

आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली
या संस्थेचे ज्ञापन [मेमोरेण्ड्म ऑफ असोसिएशन]

१) संस्थेचे नांव : **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली**

२) संस्थेच्या कायार्लयाचा पत्ता : **आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), ता. देसाईगंज, जि. गडचिरोली**

**३) संस्थेचे उद्देश :**

१. माजी विद्यार्थ्यांना चांगले नागरिक होण्यासाठी शिक्षित करणे व या साठी संमेलन आयोजित करणे.
२. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास व कल्याणाशी संबंधित शैक्षणिक संस्थाना मदत करणे.
३. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करण्यासाठी शिष्यवृत्ती, बक्षिसे व इतर सहकार्य देणे.
४. उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा सन्मान करणे.
५. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, व्यक्तीमत्व विकास, अभ्यासक्रम व शिष्यवृत्ती बाबत मार्गशदर्शन उपलब्ध करून देणे.
६. रक्तदान, आरोग्य शिबीर, प्रौढ शिक्षण, महीला सक्षमीकरण प्रकल्प, विद्यार्थ्यांसाठी रोजगार व स्वयंरोजगार विकास, युवकांमध्ये कौशल्य विकास, कमवा आणि शिका योजना सेवाभावी कार्यक्रम राबविणे.
७. विद्यार्थ्यांच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यासठी कार्यक्रम राबविणे.
८. शिक्षणाचा, संस्कृतीचा आणि नैतिक मुल्यांचा प्रसार करण्यासाठी परिषदा, संमेलन, कार्यशळा, व्याख्याने आणि कार्यक्रम आयोजित करणे.

१) संस्थेचे नांव- आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली या संस्थेच्या नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेचा कारभार सोपिवण्यात आलेला आहे अशा पहिल्या कायर्कारी मंडळाच्या सभासदांचे संपूर्ण नांवे, पत्ता, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व पूढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | संपूर्ण नाव | पत्ता | हुद्दे | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. भरत संतोषकुमार शामदासानी | रा. कन्नमवार वार्ड, सिंधी कॉलोनी, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | अध्यक्ष | ४२ | व्यापार | भारतीय |
| २. | कु. माधुरी माणिक नाकाडे | द्वारा. श्रीराम गहाणे, प्रागतिक गर्ल्स हायस्कुल, गांधी वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | उपाध्यक्ष | ४१ | नोकरी | भारतीय |
| ३. | श्री. मो. एजाज. मो. युनुस खानानी | रा. किदवाई वार्ड, मदिना मजीद जवळ, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | सचिव | ४१ | व्यापार | भारतीय |
| ४. | श्री. अशरफ अब्दूल रऊफ खानानी | रा. किदवाई वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | सह सचिव | ३८ | व्यापार | भारतीय |
| ५. | श्री. मो. शौकत हुसैन मो. युनूस पंजवानी | रा. जवाहर वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | खजिनदार | ४० | व्यापार | भारतीय |
| ६. | श्री. राजेंद्र मोतीराम बुल्ले | रा. सावंगी, ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | सह खजिनदार | ४४ | खाजगी नोकरी | भारतीय |
| ७. | श्री. नितीन मनोहर लांडगे | रा. जुनी वडसा रोज, वडसा वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | कार्यकारी सदस्य | ४० | धान्य अडत्या | भारतीय |
| ८. | श्री. नितीन दादाजी राऊत | मु. पो. कोंढाळा, ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | कार्यकारी सदस्य | ४१ | कंत्राटदार | भारतीय |
| ९. | श्रीमती. अलका शैलेश सोयाम | द्वारा. रामराव सोयाम, बाबुल चुना कारखाना जवळ कन्नमवार वार्ड, देसाईगंज (वडसा) ता. देसाईगंज जि. गडचिरोली ४४१२०७ | कार्यकारी सदस्य | ४१ | नोकरी | भारतीय |

आम्ही खाली सही करणार आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची इच्छा असनु वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोजी** ही संस्था आज दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी स्थापन केलेली असनु ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सहया केलेल्या आहेत.

| अ. क्र. | संपूर्ण नाव | हुद्दे | सहया |
|---|---|---|---|
| १ | श्री. भरत संतोषकुमार शामदासानी | अध्यक्ष | Bharat |
| २ | कु. माधुरी माणिक नाकाडे | उपाध्यक्ष | Ku. Nakade |
| ३ | श्री. मो. एजाज. मो. युनुस खानानी | सचिव | [illegible] |
| ४ | श्री. अशरफ अब्दूल रऊफ खानानी | सह सचिव | A.Khanani |
| ५ | श्री. मो. शौकत हुसैन मो. युनूस पंजवानी | खजिनदार | moho. Shaukat |
| ६ | श्री. राजेंद्र मोतीराम बुल्ले | सह खजिनदार | [illegible] |
| ७ | श्री. नितीन मनोहर लांडगे | कार्यकारी सदस्य | [illegible] |
| ८ | श्री. नितीन दादाजी राऊत | कार्यकारी सदस्य | Raut |
| ९ | श्रीमती. अलका शैलेश सोयाम | कार्यकारी सदस्य | Soyam |

स्थळ: देसाईगज (वडसा)
दिनांक: 26/10/2020

वरील सहया करणाऱ्या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझे समक्ष या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

Executed & Signed Before Me

ADV.P.M.BUDHE
NOTARY (Govt. Of India)
Regd.No.15904, DESAIGANJ
DIST GADCHIROLI

(नोटरी / सनदी लेखापाल / वकील / विशेष कार्यकारी दंडाधिकारी)

परिशिष्ट 'क'

आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली

या संसथेची नियम व नियमावली [आर्टीकल ऑफ असोसिएशन ]

१) नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या:

अ) 'संस्था' याचा अर्थ, आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली ही संस्था असा समजावा; कायदयाप्रमाणे याचा अर्थ सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६०/ मंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनयम १९५० अन्वये समजावा.

ब) **कार्यकारी मंडळ** : कार्यकारी मंडळ म्हणजे **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा)**, या संस्थेचा कार्यकारी मंडळ समजावा.

क) **अध्यक्ष** : अध्यक्ष म्हणजे **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा)**, या संस्थेचा अध्यक्ष समजावा.

ड) **उपाध्यक्ष** : उपाध्यक्ष म्हणजे **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा)**, या संस्थेचा उपाध्यक्ष समजावा.

इ) **सचिव** : सचिव म्हणजे **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा)**, या संस्थेचा सचिव समजावा.

फ) **सह सचिव** : सह सचिव म्हणजे **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा)**, या संस्थेचा सह सचिव समजावा.

ग) **खजिनदार** : खजिनदार म्हणजे **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा)**, या संस्थेचा खजिनदार समजावा.

ह) **सह खजिनदार** : सह खजिनदार म्हणजे **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज (वडसा)**, या संस्थेचा सह खजिनदार समजावा.

च) **कार्यकारणी सदस्य** :कार्यकारणी सदस्य म्हणजे **आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन ,देसाईगंज (वडसा)**, या संस्थेचा कार्यकारी सदस्य समजावा.

छ) **सभासद** म्हणजे या नियमावलीतील नियम क्रमांक ४ व ६ नुसार आदर्श महाविद्यालय माजी विद्यार्थी असोसिएशन, देसाईगंज **(वडसा)**, या संस्थेचा सभासद समजावा

२) **कार्यक्षेत्र** : संस्थेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्रा मध्ये मर्यादित राहील.

३) **हिशोबाचे वर्ष** : संस्थेचे हिशोबाचे वर्ष हे १एप्रिल रोजी सूरू होऊन प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चला समाप्त होईल.

४) सभासदत्व व त्याची नोंदणीची पद्धत :

[illegible] अटी मान्य असणान्या कोणत्याही भारतीय व्यक्तीस सामान्य सदस्य बनविता येईल.

- सभासद होण्यासाठी व्यक्ती हा आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असावा.
- संस्थेचे सभासद होण्यासाठी संस्थेचे ध्येय, उद्देश व नियमावली मान्य असायला पाहिजे.
- सभासद होण्यासाठी कोणत्याही नागरिकास ज्याने वयाची १८ (अठरा) वर्षा पूर्ण केलेली असावी.
- नियमावली व नियम क्रमांक ५ नुसार सभासद नोंदणी वर्गणी/ फि भरावी.
- संस्थेच्या सभासद्त्वासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याची योग्य छाननी करण्यांत येईल, कार्यकारी मंडळाने बहुमताने त्यांस मान्यता दिल्यावर अध्यक्षांचे मंजूरी स्वाक्षरी नंतर त्यांस संस्थेचा सभासद करून घेण्यांत येईल.

अशारितीने नियमावलीतील नियमांच्या अधिन राहून सभासद्त्व प्राप्त झाल्यानंतर त्यांचे नांव संस्थेच्या सभासद नोंदवही मध्ये नोंदिवण्यांत येईल. कार्यकारी मंडळाचा निर्णय सर्वमान्य राहील. सभासद हा ठरावान्वये या संस्था स्थापनेच्या वेळी त्या दिनांकास असणारे सर्व सदस्य हे आपोआपच संस्थेचे कायमस्वरूपी /आजीव सभासद समजले जातील. नियमावलीतील नियम सदर क्रमांक ४ व ६ मधील तरतदींच्या अधिन राहून मतदानाचा व निवडणकीला उभे राहण्याचा अधिकार सभासदाला असेल.

सभासद्त्वासाठी आलेला अर्ज कारण न देता नाकारण्याचा अधिकार विद्यमान कार्यकारी मंडळाला असेल. एकदा अर्ज नाकारल्यावर त्या व्यक्तीस पुन्हा २ महीने कालावधी पर्यत अथवा कार्यकारिणीच्या पढील बैठकीच्या दिनांका पर्यत अर्ज करता येणार नाही. मात्र अजर्दाराने पन्हा अर्ज केल्यास त्याच्या अर्जास प्राधान्य देण्यांत येईल.

५) **सभासदत्व रद्द होणे** : खाली नमूद केलेप्रमाणे अनेक कारणांनी सभासदत्व रद्द होऊ शकतेक्

- नियमानूसार मसिक/वार्षीक वर्गणी/फी न भरल्यांस सभासदत्व रद्द करण्यात येईल.
- सभासदाची वर्तणूक /वागणूक संस्थेच्या कार्यास घातक ठरत असेल, ज्ञापन / नियमावलीतील तरतूदींचे उल्लंघन करित असेल, निर्घूण कृत्य केल्यास, संस्थेंस किंवा महाविद्यालयाची हानी/ नूकसान होईल, अतिप्रष्ठा दुर्लौकीक होण्यास कारणीभूत ठरेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासद्त्व रद्द करण्यांत येईल. अफरातफर अथवा सस्थेची फसवणूक केल्यास, सस्थे किंवा महाविद्यालया विषयी अपचार केल्यास अथवा संस्थेस तोषिस लागेल असे कृत्य केल्यास अशा सभासदांचे सभासद्त्व रद्द करण्यांत येईल
- फौजदारी खटूल्यांत दोषी ठरून कायदेशीर शिक्षापात्र ठरल्यास, कायद्यानुसार दिवाळखोर सिध्द झाल्यास सभासद्त्व रद्द करण्यांत येईल.
- संस्थेचे काम करण्यांस कायदेशीर अपात्र ठरविले असल्यांस, लेखी स्वरूपात राजिनामा दिलेला असेल आणि राजिनामा मंजूर झाला असेल तर सभासदत्व रद्द करण्यात येईल.
- वैद्यकीय शारिरीक / मानसीक दृष्टया संस्थेचे काम करण्यांस असमर्थ असल्यांस, मृत्यु अथवा अन्य कारणाने सभासदत्व रद्द करणेत येईल.

Bharat    [signature]    Mohd. Shaukat

सभासदत्व रद्द करण्याबाबतचे निर्णय कायकारी मंडळ २/३ बहुमताने घेईल.

६) सभासदांचे प्रकार: या नियमावलीतील नियम क्रमांक ४ चे अधिन राहून सभासदांचे खालील प्रमाणे एकूण दोन प्रकार असतील

- आजीवन सभासद : संस्थेस एक रक्कमी रूपये. ५००/— (अक्षरी रू. पाचशे फक्त) देणाऱ्या वय वर्ष १८ पूर्ण केलेल्या आदर्श महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी असलेल्या कोणत्याही भारतीय व्यक्तीस संस्थेचा आजीवन सभासद/ कायमस्वरूपी सभासद म्हणन संबोधले जाईल. सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीच्या अर्जास कायर्कारी मंडळाने मंजरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांका पासून त्या व्यक्तीस आजीवन सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. आजीवन सभासदांना मतदानाचा तसेच निवडणूकीस उमेदवार म्हणन उभे राहण्याचा अधिकार असेल. तसेच ठरावान्वये या संस्थां स्थापनेच्यावेळी त्या दिनांकास असणारे सर्व सदस्य हे आपोआपच संस्थेचे कायमस्वरूपी/आजीवन सभासद समजले जातील.

- सवर्साधारण सभासद : संस्थेकडे वार्षिक कालावधीसाठी वर्गणी/ फी रूपये १००—(अक्षरी रू. शंभर फक्त ) भरणाऱ्या वय वर्ष १८ पूर्ण केलेल्या आदर्श महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी असलेल्या कोणत्याही भारतीय व्यक्तीस संस्थेचा सवर्साधारण सभासद म्हणन सबोधलें जाईल. सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीच्या अर्जास कार्यकारी मडळानें मंजूरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासन त्या व्यक्तीस सवर्साधारण सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. सवर्साधारण सभासदाला त्याच्या सभासदत्वाच्या कालावधीतच फक्त मतदानाचा अधिकार असेल. वार्षीक वर्गणी देणाऱ्या सभासदांना त्याच्या सभासदत्वाच्या कालावधीतच मतदानाचा व निवडणकीस उमेदवार म्हणन उभे राहण्याचा अधिकार असेल. मात्र ज्या सभासदंची संपूर्ण वर्गणी आलेली नाही अशा सभासदांना मत देण्याचा अधिकार अथवा निवडून येण्याचा अधिकार राहणार नाही.

## ७) वार्षीक सवर्साधारण सभा व तिची कार्य :

वार्षीक सवर्साधारण सभा ही सस्थेची सर्वश्रेष्ठ व अंतीम निर्णय देणारी सभा समजली जाईल. सर्वसाधारण सभा वर्षाला किमान एक सभा घेतली पाहीजे. या सभेत सर्व प्रकारचे विद्यमान सभासद भाग घेऊ शकतील.

- सभेचे मागील इतिवृत्त वाचन कायम करणे/मान्यता देणे,
- कार्यकारी मंड्ळाने चालिवलेल्या कारभारावर नियंत्रण ठेवणे,
- वार्षीक हिशोब /जमा खर्च मंजूर करणे,
- पढील वषार्चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे,
- नविन सभासदाची निवड करणे
- संस्थेच्या नियम व नियमावलीत २/३ बहूमताने बदल करणे.
- वेळेवर येणाऱ्या ठरावांवर नियंत्रण ठेवणे, सस्थेपूढील गहन व महत्वाच्या विषयांवर चर्चा करणे व निणर्य घेणे

## ८) सवर्साधारण सभा, सुचना व गणसंख्या :

सर्वसाधारण सभेचे स्थळ, दिनांक, वेळ, गणसंख्या, अजेंडा या बाबतची सुचना सर्वांना सभेच्या किमान १५ दिवस अगोदर देणे आवश्यक राहील. सभेची सुचना किमान १५ दिवस अगोदर अध्यक्षांच्या संमतीने सचिवाने सर्वप्रकारच्या सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये वरील प्रमाणे माहिती तसेच सभेपढील विषय

Bharat

mohd. Shaukat

नमूद करावेत. सभेची सुचना देतांना सुचना बुकावर त्यांचे हस्ताक्षर घेण्यात येईल एकूण सभासद संख्येच्या [illegible] पटीने सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पर्ण झाली असे समजण्यांत येईल. पुरेशी गणसंख्या न जमल्यास तहकुब /स्थगीत सभेला पून्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही. पुरेशा गणसंख्ये अभावी स्थगीत सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यांत येईल. मात्र अशा सभेत घेण्यांत आलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक असेल. परंतू अशी सूचना नमूद असणे आवश्यक आहे.

**९) विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्य :**

विशेष सर्वसाधारण सभा आवश्यकते नुसार केव्हाही घेता येईल. जी कार्य वार्षीक सवर्सधारण सभा करू शकते अशी सर्व कार्य करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला असेल. सस्थेच्या कार्यकारी मंळडाचे सभासदांची मागणी केल्यास अध्यक्ष विशेष सवर्सधारण सभा आयोजित करेल. जर अध्यक्ष १५ दिवसाच्या आत सभा आयोजित केली नाही तर कार्यकारी मंडळावचे दोन सभासद १५ दिवसाच्या आत विशेष सवर्सधारण सभा बोलवतील / आयोजित करतील. विशेष सवर्सधारण सभेसाठी मतदानाचा हक्क असलेल्या एकूण ३/५ सभासदांची गणसंख्या असेल. विशेष सभेच्या सूचनेमध्ये सर्वसाधारण सभेप्रमाणे सभेची माहिति व सभेपूढील विषय नमुद असावेत. पुरेशी गणसंख्या न जमल्यास त्याच विषयाच्या सदर तहकूब / स्थगीत सभेला पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही. पुरेशा गणसंख्ये अभावी स्थगीत सभा पून्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यांत येईल. मात्र अशा सभेत घेण्यांत आलेला निणर्य सर्वांवर बंधनकारक असेल.

**१०) संसथेचे कायर्करी मंडळ व त्याची रचना:**

संस्थेचे कार्य, व्यवहार पाहणेसाठी कार्यकारी मंडळ/ विश्वस्त मंडळ असेल, यामध्ये कमीतकमी ०९ सदस्य असतील. त्यांची रचना पढील प्रमाणे राहील — १. अध्यक्ष, २. उपाध्यक्ष, ३. सचिव ४. सहसचिव, ५. खजिनदार, ६. सह खजिनदार, ५. अनु. क्र. ७ ते ९ हे कार्यकारी सदस्य/विश्वस्त असतील.

**११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणकीची पद्धत:**

कायर्करी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षाचा राहील. निवडणकीची पध्दत — लोकशाही पध्दतीने गुप्त मतदान करून सर्वसाधारण सभेमध्ये दर ५ वर्षानी कार्यकारी मंडळ /विश्वस्त मंडळाचे सदस्य निवडले जाईल. कार्यकारी मंडळात वरील नियम क्रं. १० नुसार एकूण पदाधिकारी /विश्वस्त निवडले जातील.

**१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कार्ये/जबाबदारी:**

**अ) अध्यक्ष:**

१. संस्थेच्या अध्यक्षांनी संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषवावे व नियंत्रण करावे.
२. संस्थेच्या सर्व सभांचे कामकाज नियम व नियमावली नुसार संस्थाहितार्थ चालवावे.
३. संस्थेच्यावतीने रक्कमेची देवाण—घेवाण करणे.
४. संस्थाहितार्थ विविध करार करणे.
५. सभासदांचा राजिनामा मंजूर करणे बाबत अंतिम अधिकार अध्यक्षाना राहिल.
६. मतांची बरोबरी झाल्यास जास्तीचे मत/निणार्यक मत देण्याचा अधिकार अध्यक्षांनी बजवावा.

सर्व अंतीम अधिकार अध्यक्षांना असतील.

संस्थेच्या सर्व प्रशासकीय कार्याची जवाबदारी अध्याक्षांची राहील.

उपाध्यक्ष:

१. संस्थेच्या अध्यक्षांच्या आदेशांचे पालन उपाध्यक्षांनी करावे.

२. संस्थेच्या कार्यात अध्यक्षांना मदत करणे.

३. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत अध्यक्षांना असलेले सर्वाधिकार वापरून संस्थाहितार्थ संस्थेचे कामकाज चालवावे.

४. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत/गैरहजेरीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षस्थान भुषवावे व नियंत्रण करावे.

**क) सचिव / सेक्रेटरी :**

१. सचिव /सेक्रेटरी यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.

२. संस्थेच्या सर्वसभा आयोजित करणे, तसेच प्रत्येक सभेचे इतिवृत्त, कार्यवृत्त हे इतिवृत्तनोंदवही मध्ये लिहावे. व पढील सभेत ते वाचून दाखवावे.

३. संस्थेच्या सर्व सभांचे अजेंडा ठरविणे.

४. सभांमध्ये पारित ठरावांची अंमलबजावणी करणे.

५. संस्थेचे कर्मचारी म्हणून विविध पदांवर नेमणूका करणे — नोकरीतून काढून टाकणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी नियम तयार करावेत त्यांचेवर लक्ष ठेवणे.

६. संस्थेचे कोर्ट कचेरीचे कामकाज पाहणे व संस्थेच्या नावें पत्रव्यवहार करणे.

७. संस्थेच्यावतीने रक्कमेची देवाण—घेवाण करणे.

८. वार्षीक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके, महत्वाचे अहवाल वेळोवेळी तयार करणे, सुरक्षित ठेवणे व संबंधीत विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.

९. कायर्कारी मंडळाचे संमतीने किरकोळ नियम तयार करणे. सभसदांच्या तक्रारी एकुण घेणे व कार्यकारी मंडळाच्या संमतीनंतर योग्य ती कार्यवाही करणे.

१०. संस्थेच्या मोठा खर्चाची बिले मंजूर करणे.

११. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत संस्थेच्या सभांचे अध्यक्षपद स्विकारून संस्थाहितार्थ कामकाज चालिवणे.

**ड) सहसचिव :**

१. सचिवांच्या कार्यात सहकार्य करणे

२. सचिवाच्या अनुपस्थितीत सचिव म्हणून संस्थेचे काम पाहणे.

**इ) खजिनदार:**

१. खजिनदार यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे.

२. वार्षीक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके तयार करणे व संबंधीत विभागांकडे विहीत वेळेत सादर करणे.

३. संस्थेच्या खर्चाची बिले मंजूर करणे, पावत्यांवर सहया करणे. मालमत्तेची देखरेख करणे.

Bharat mohd. Shaukat

४. मोठा खर्चाची बिले सचिवांच्या संयुक्त सहीने मंजर करणे. संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे.

५. संस्थेच्या जमा खर्चाचे हिशोब ठेवणे व त्यासंबंधीच्या नोंदवह्या सुस्थितीत ठेवणे.

६. खजिनदाराने सभासदांची सुची तयार करून त्यांचे वगर्णीचा हिशोब सुस्थितित व अद्ययावत ठेवावा.

७. संस्थेच्या नांवे वेळोवेळी येणाऱ्या कोणत्याही रक्कमा, वर्गणी, देणग्या, प्रवेश शुल्क, निधी, चिजवस्तू वगैरे स्विकाराव्यात आणि त्याबाबत छापिल पावत्या द्याव्यात.

८. लेखापिरक्षकांनी काढलेल्या त्रुटींची त्वरीत पूर्तत: करणे.

९. संस्थेचे वार्षीक अंदाजपत्रक तयार करणे

**फ) सह खजिनदार:**

१. खजिनदाराच्या कार्यात सहकार्य करणे

२. खजिनदाराच्या अनुपस्थितीत खजिनदार म्हणून संस्थेचे काम पाहणे.

**ग) कार्यकारी सदस्य / कार्यकारी विश्वस्त:**

१. सर्व कार्यकारी सदस्यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे व सचिवांना त्यांचे कार्यात परवानगी नुसार आवश्यकते प्रमाणे मदत करावी.

२. सर्व सभांमध्ये उपस्थित राहणे.

३. संस्थेच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.

४. निवडणकीस मतदान करणे

५. संस्थेस सूयोग्य निर्णय घेण्यास/योग्य निर्णय पारित करण्यांस मदत करणे.

६. संस्थेचे नांव, कार्य सर्वसामान्यापर्यंत पोहचविणे कामी सर्वकामे करणे.

**१३) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य:**

- कार्यकारी मंडळ संस्थेच्या सर्व कारभाराचे नियंत्रण व संचालन करेल.
- कार्यकारी मंडळ संस्थेच्या सभांमध्ये पारित झालेल्या सर्व ठरावांची पुर्तता करेल / करवून
- घेईल. संस्थेच्या स्थावर, जंगम मालमत्तेवर लक्ष ठेवणे, देखरेख करणे.
- मा. सहाय्यक संस्था निबंधक / मा. सहाय्यक धमार्दाय आयक्त यांचे कडे विविध विवरण पत्रके, हिशोबपत्रके, रिपोर्ट विहीत वेळेत सादर करणे,
- संस्थेच्या हितार्थ कोर्ट कचेरीचे कामकाज करणे, न्यायालयांत दावे दाखल करणे व संस्थेच्या हितामध्ये कामकाज करणे, जाहिरात देणे. संस्थेवर असलेल्या कायदेशिर बाबींची पूर्तता करणे.
- संस्थेच्या हितामध्ये आवश्यक ते आदेश पारित करणे व योग्य ती पुर्तता करणे.करणे. विविध सेवा—संहितांसाठी करार करणे.
- विविध रक्कमांची देवाण—घेवाण करणे.
- नियम व आवश्यकतेनसार सूचना देऊन सभांचे आयोजन करणे

- संस्थेच्या हितामध्ये आवश्यकतेनसार नियम व नियमावलीच्या, आणि उद्देशांच्या अधिन राहून नियम /पोटनियम तयार करणे. आवश्यकतेनसार त्यात बदल करणे.
- तक्रारींची दखल घेणे, योग्य ते दिशानिर्देश देणे /माहिती देणे.
- हिशोबांवर, जमा—खर्च्या नोंदींवर नियंत्रण ठेवणे.
- आवश्यकतेनसार स्थनिक समिती, उपसमिती नेमणे व काम पर्ण होताच त्या बरखास्त करणे.
- सभासदत्वासाठी आलेल्या योग्य नमून्यातील अर्जावर विचार करून निणर्य घेणे आणि अर्ज मंजूर/नामंजूर करणे.
- कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरणे बाबत / कार्यकाल पर्ण झाला असल्यास नियमांनूसार तात्काळ कायर्वाही करणे. अचानक रिक्त झालेनया पदांबाबत उरलेल्या कालावधीसाठी रिक्त पदे भरणे बाबत नियमांनुसार तात्काळ कायर्वाही करणे.
- संस्थेच्या कामकाजासाठी सेवकांची नियक्ती करणे — त्यांना रितसर काढून टाकणे.
- संस्था हितार्थ बहुमताने विविध निर्णय घेणे.

**१४) कायर्कारी मंडळाची सभा व मागणीची सभा:**

कायर्कारी मंडळाची सभा २ महिन्यातून एकदा आयोजित करण्यांत येईल.कार्यकारी मंडळाची सभा नियम व नियमावली नुसार घेत नसल्यास कार्यकारी मंडळातील १/३ सभासदांनी स्वत: सहीनिशी अध्यक्ष/सचिव यांचे कडे अर्ज करून सभा भरविण्यची मागणी केल्यास अध्यक्षांनी सदर मागणी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासन १५ दिवसांचे आंत कार्यकारी मंडळाची सभा घ्यावी असे बंधन राहील. अध्यक्षांनी अशी सभा बोलावली नाही तर कार्यकारी मंडळातील वरील १/३ सभासदापैकी दोन सभासद सभा आयोजित करू शकतील व या सभेला कायर्कारी मंडळाच्या सभेचे पूर्ण अधिकार असतील. सदर सभांच्या सूचनेमध्ये 'मागणीची सभा' असे नमद करणे आवश्यक आहे. कायर्कारी मंडळाची मागणीची सभा भरवून मागणी अर्जाप्रमाणे त्यावर निणर्य घेतले पहिजे.

**१५) कायर्कारी मंडळाची सभा व मागणीची सभेची सुचना व गणसंख्या:**

कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना कार्यकारी मंडळाच्या सभेची लेखी सुचना सचिवाने कमीतकमी आठ दिवस अगोदर द्यावी. सभेची सूचना व अजेंडा रजिस्टर पोस्टाने, नोंद घेऊन हस्तदेय पाठिवले जाऊ शकतात. तसेच सूचना कार्यालयाचे दर्शनी भागातील सूचना फलकावर लावण्यांत येईल. सभेच्या सूचनामध्ये तारीख, वेळ, ठिकाण, नमूद असेल.

